**मुद्दा क्र. १२**

**कलम ४ (१) (ब) (xii)**

परिपत्रक क्र.वैद्य/१/कावि/१५०/१९९६ दि.१८/०३/१९९६ अन्वये

दि.१५/०३/१९९६ रोजी अंध व्यक्तींच्या शिष्ट मंडळाने मोफत वैद्यकिय सेवेच्या मागण्यांबाबत मा. आयुक्त सो. यांचे समवेत झालेल्या चर्चेमध्ये अंधाबरोबर अस्थि, मुक बधिर, मतीमंद, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यां, गरीब निराधार रूग्ण, भुकंप ग्रस्त अशा रूग्णांना वैद्यकीय सेवा देताना ४०% रूग्णांना मोफत रूग्ण सेवेबाबतच्या सवलती देणेबाबत मान्यता देण्यात आली. तथापि, बाहयरूग्ण फी माफ करण्यात येऊ नये.

आदेश क्र.वैद्य/७/कावि/२३०३/२००६ दि.०९/११/२००६ अन्वये

१. राष्ट्रीय कार्यक्रमातंर्गत दिले जाणारे उपचार सर्व रूग्णांना अंशत: किंवा पुर्णत: मोफत देण्यात यावेत.
२. म.न.पा. हद्दीतील रूग्णांना औषधपचारासाठी फी माफी किंवा सवलत देताना वास्तव्याचा पुरावा म्हणून रेशनकार्ड, लाईटबिल, टेलिफोन बिल, ओळखपत्र आणि योग्य तो म.न.पा हद्दीतील वास्तवयाचा पुरावा यापैकी एक पाहुनच कार्यवाही करण्यात यावी.फी माफी किंवा सवलत देताना यापैकी एक पुराव्याची सत्यप्रत नस्तीस ठेवावी.परंतु उपचार देताना कोणताही पुरावा मागु नये.
३. म.न.पा. हद्दीबाहेरील सर्व प्रकारच्या रूग्णांना मंजुर दरपत्रकाप्रमाणे औषधोपचार,रूग्णसेवा देण्यात यावी.म.न.पा. हाद्दीबाहेरील सर्व प्रकारच्या रूग्णांना फी माफी / सवलत किंवा इतर कसलीही सवलत देता येणार नाही.
४. म.न.पा.अधिकारी / कर्मचारी व पालिकेचे आजी - माजी नगरसदस्य व या सर्वांचे कुंटूंब व्याख्येनुसार त्याचेवर अवलंबुन असणा-या व्यक्तींना मोफत उपचार सुविधा देणेत याव्यात.
५. शहरातील दारिद्र रेषेखालील रूग्ण, आपत्कालीन स्थितीतील रूग्ण (भुकंप, पुरग्रस्त बेवारस, पत्रकार व वारकरी इ.) जेष्ठ नागरिक, स्वातंत्र सैनिक, सेवा निवृत्त कर्मचारी, पत्रकार, वाय.सी.एम.रूग्णालय येथे नियुक्तीस येणारे पोलिस कर्मचारी, मानधनावरील व अन्य प्रकारे काम करणारे कर्मचारी (घंटागाडी, अंगणवाडी, लिव्ह व्हेकन्सी, सी.पी.एस व इंटर्न डॉक्टर्स) यांना वैद्यकिय सेवा मोफत देणेत यावी.

६. म.न.पा.हद्दीबाहेरील असले तरी दारिद्रय रेषेखालील रूग्ण, जेष्ठ नागरिक, स्वातंत्र सैनिक यांनी तसा पुरावा सादर केलेनंतर औषधोपचार रूग्णसेवा मोफत देणेत यावी.

आदेश क्र.वैद्य/७/कावि/२२२८/२००६ दि.२०/१०/२००६ अन्वये

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माननीय सदस्यांचे शिफारशीचा आधारे रूग्णसेवा बिलामध्ये ५०% अथवा पुर्णत: रक्कम सवलत/माफीचे/अधिकार मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांना राहतील.

आदेश क्र.वैद्य/७/कावि/२४०८/२००७ दि.२०/०९/२००७ अन्वये

जेष्ठ नागरिकांना वय ६० वर्षे व त्यावरील तसेच माजी राज्य स्तरीय खेडाळू,माजी राष्ट्रीय स्तरावरील खेडाळू, माजी सैनिक व महानगरपालिका शहरातील मतिमंद, अपंग मुकबधीर व्यक्तींना पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे रूग्णालय / दवाखान्यात आवश्यक ते पुरावे सादर केलेनंतर विनाशुल्क उपचाराची सवलत देणेस मान्यता देत आहे. मात्र केसपेपरी फी + तपासणी फी माफ असणार नाही.